

तरुण मनाचा गीतकार आनंद बक्षी

तुम्हाला माहीत आहे का? आजपर्यंत साडेचार हजार गाणी लिहिणाऱ्या आनंद बक्षी यांनी चित्रपटांसाठी पार्श्वगायनही केलेलं आहे.

□ ज्योती व्यंकटेश

सुमारे चाळीस वर्षांपूर्वी नजरेत हजारो स्वप्नं घेऊन मुंबईला थडकलेल्या आनंद बक्षींनी राज कपूरकडे काम मिळवण्याचा प्रयत्न केला. पण राज कपूरच्या सेक्रेटरीने (हिरेन खेरा) त्या तरुण गीतकाराच्या स्वप्नांवर बोळा फिरवत सांगितलं की, राज कपूर तरुण गीतकारांना कधीच संधी देत नाहीत. त्याचबरोबर त्याला आगंतुकासारखा सल्लाही दिला होता की भविष्यात आपण स्वत: निर्माता झालो तर तुला अवश्य संधी देऊ. त्यावेळी हिरेन खेराला कल्पना नव्हती की तो एका प्रतिभावंत गीतकाराशी बोलत होता.

मात्र दिलेल्या वचनाला जागून पुढे *मेहेंदी लगी मेरे हाथ* या आपल्या चित्रपटासाठी त्याने आनंद बक्षीला संधी दिली. बक्षीसाहेब म्हणतात, 'आज मुंबईत कोणत्याही क्षेत्रात काम करू इच्छिणाऱ्या माणसाला ब्रेक मिळणं सहज सोपं झालंय. कारण यातले बरेच जण मुंबईवासीच असतात. पण त्यावेळी मी इथे नवखा होतो. इथे माझं कोणीही परिचयाचं नव्हतं. तुम्हाला खरं वाटणार नाही पण मरीन लाइन्स स्टेशनच्या एका टीसीला माझी दया आली आणि त्यांनी मला राहायला जागा दिली. माझ्या अंगी महत्त्वाकांक्षा होती आणि मुख्य



म्हणजे इथे बस्तान बसलं नाही म्हणून गावी परत जाण्याइतका पैसाही गाठीशी नव्हता. पण माझ्यासारख्या अनोळखी माणसाला त्यांनी आसरा दिला, प्रेमाने वागवलं. सहा-सात वर्षं मी त्यांच्याबरोबर राहात होतो.


आजकाल कोणी गीतकार बनण्याच्या ध्येयापोटी या क्षेत्राकडे वळतच नाही. कारण सगळ्यांना ॲक्टर बनायचं असतं. मला आठवतंय, माझ्या संघर्षाच्या दिवसांत एका संगीतकाराने मला सरळ विचारलं की 'त्यांनी माझी गाणी का घ्यावीत?' यावर मी निर्भयपणे उत्तर दिलं की, मी चांगला गीतकार आहे. यावर ते उपहासाने म्हणाले, 'या मुंबईत गल्लोगल्ली असे गीतकार आहेत.'

आजपर्यंत बक्षी साहेबांनी जवळजवळ साडेचार हजार गाणी लिहिली आहेत. यापैकी त्यांना स्वतःला आवडणारी गाणी, 'चिंगारी कोई भडके...', 'ताल से ताल मिला...', 'परदेसीयोंसे ना अखिया मिलाना...', 'मैंने पूछा चांदसे...' आणि 'सोलह बरस की बाली उमर को सलाम...' अशी निवडक असली तरी बक्षी साहेबांची कितीतरी गाणी लोकप्रियतेच्या शिखरावर होती. 'पण आज खेदाची गोष्ट म्हणजे अशी मेलोडीयस गाणी आता हळूहळू लोप पावत चालली आहेत. म्हणूनच बरीच वर्षं मनात रेंगाळणारी गाणी आता कानावरच पडत नाहीत. ही परिस्थिती अशीच राहिली तर हिंदी चित्रपट संगीताला वाईट दिवस येतील. आजकाल तर चित्रपटांची कथानकंही एकसारखीच असतात आणि तेच तेच चेहरे पडद्यावर दिसतात. त्यामुळे एका चित्रपटातलं गाणं उचलून दुसऱ्यात टाकलं तरी फारसा फरक पडणार नाही.'

राहुलची गाणी सिच्युएशनला अनुसरून झाली आहेत याचं मला समाधान वाटतं. ही गाणी लोकप्रिय होण्याचं सगळं श्रेय सुभाष घई आणि अनु मलिक यांना द्यायला हवं. हल्ली कथानक आणि पात्रांचा विचार करून गाणी लिहिण्याची संधी विशेष मिळतच नाही. राहुलची गाणी माझ्या डोक्यातून नाही तर हृदयातून स्फुरली आहेत.

आजपर्यंत लिहिलेल्या माझ्या एकाही गाण्यासाठी मला लाज वाटली नाही किंवा पश्चात्ताप झाला नाही. कथानकाला पूरक गीतं लिहिणंच मी अधिक पसंत करतो. माझ्या सुदैवाने आजपर्यंत अश्लील गाणी लिहिण्याचा प्रसंग माझ्यावर कधीच आला नाही. *विधाता*मधलं 'सात सहेलीया खडी खडी...' किंवा *खलनायक*चं 'चोली के पीछे क्या है...' ही गीतं वल्गर आहेत असं मला वाटत नाही. कारण ही दोन्ही लोकगीतांवर आधारित गाणी






होती,' आनंद बक्षी सांगतात.

सुभाष घईच्या *हिरो*पासून त्याच्यासाठी गाणी लिहायला सुरुवात केली. सुभाष जेव्हा निर्माता नव्हता तेव्हाही त्याच्या *मेरी जंग, गौतम गोविंदा, विधाता* या चित्रपटांसाठी मी गीतं लिहिली आहेत. आजपर्यंत आमचं एकमेकांशी छान जमलं आहे. मी त्याला माझ्या छोट्या भावाप्रमाणे समजतो. यशजींबरोबरही माझे संबंध अत्यंत जिव्हाळ्याचे आहेत. *चांदनी*पासून *मोहब्बतें*पर्यंत त्यांच्या सगळ्या चित्रपटांसाठी मीच गीतं लिहिली आहेत.'

या इंडस्ट्रीत असा एकही संगीतकार नाही ज्याच्यासाठी मी गीतं लिहिली नाहीत. सी. रामचंद्र, नौशाद, मदन मोहन, अनिल विश्वास, शंकर जयकिशन, लच्छीराम, एस. मोहिंदर, सोनिक ओमी, अनु मलिक, राजेश रोशन, जतीन-ललित, एस. डी. बर्मन, आर. डी. बर्मन, लक्ष्मीकांत-प्यारेलाल, कल्याणजी-आनंदजी आणि अगदी ए. आर. रेहमानपर्यंत मी सगळ्यांसाठी गीतं लिहिली आहेत. अपवाद फक्त ओ. पी. नय्यरचा. पण त्याचा मला खेद नाही. कारण त्यांच्यासाठी गीतं लिहिण्याची माझी इच्छाही नाही.

त्यावेळच्या आणि आजच्या गीतांमध्ये तुम्हाला कोणता फरक जाणवतो या प्रश्नाचं उत्तर देताना बक्षी साहेब म्हणतात, 'त्या काळातली गाणी हृदयस्पर्शी, अर्थपूर्ण असायची. त्याला भारतीय बाज असायचा. पण आज हिंदी चित्रपट गीतांचा स्तर खूपच घसरला आहे. कॅब्रे, पॉप, बॉलरूम टाइपच्या गाण्यात शब्दांना अर्थ नाही म्हणून किंमतही नाही. प्रसंगानुरूप गाणी तर हल्ली क्वचितच आढळतात.'

हिंदी चित्रपट रसिकांना कदाचित माहीत नसेल की आनंद बक्षी यांनी पार्श्वगायनही केलेलं आहे. 'मी काही खूप गाणी गायलेलो नाही. मोजून चारच गीतं गायक म्हणून माझ्या खात्यावर आहेत. त्यात *मोम की गुडीया*तलं 'बागों में बहार आयी...', नरेंद्र बेदीच्या *महाचोर*मध्ये आशा भोसलेंबरोबर 'सुन बंटो बात मेरी...' हे ड्युएट आणि शक्ती सामंतच्या चित्रपटात एक गाणं गायलं. पण ते आता लक्षात नाही, कारण ते फारसं लोकप्रिय झालं नाही. शिवाय *शोले*मध्ये मन्ना डे, किशोर आणि भूपेंदर यांच्याबरोबर कव्वाली म्हणण्यात मीही सहभागी झालो होतो. पुढे चित्रपट फारच मोठा झाल्यामुळे ती कव्वालीच काढून टाकावी लागली. मी ट्रेंड सिंगर नाही.' ते म्हणतात, प्लेबॅक सिंगर बनण्याचा प्रयत्न मी कधीच केला नाही. मला संगीतातील प्राथमिक ज्ञान बरंच होतं.'



"मुंबईत आलो त्यावेळी वाटलं होतं, की इथे काम करण्याइतका मी मोठा झालेलो नाही. पण आज वाटतंय की आजच्या तरुण म्युझिक डायरेक्टर्सबरोबर सूर न जुळण्याइतका म्हाताराही झालेलो नाही."

गीतं लिहिण्याची प्रेरणा तुम्हाला कुठून मिळते या प्रश्नाचं ते हसत हसत उत्तर देतात. 'सुरुवातीला सहज म्हणून गीतं लिहीत होतो तेव्हा मूड आला किंवा शब्द सुचले तरच लिहीत असे. पण एकदा हाच व्यवसाय करायचा ठरल्यानंतर मात्र प्रेरणा मिळण्याची वाट पाहणं शक्य नाही. कारण इथे डेडलाईन पाळावी लागते. निर्मात्याने रेकॉर्डिंगची तयारी केली आहे म्हटल्यावर गीत लिहावंच लागणार, नाही? अगोदर आम्हाला सिच्युएशननुसार गीतं लिहावी लागत. त्यावेळी थोडाफार विचार करावा लागायचा. पण आता तर कशीही गीतं असतात. निरर्थक, प्रसंगाशी काहीही घेणं-देणं नसलेली. त्यासाठी प्रेरणेची गरजच भासत नाही.'

बक्षी साहेबांना एकाच गोष्टीचा खेद आहे की, या क्षेत्रात पैशाचं महत्त्व अधिक आहे. आधीही पैशाला महत्त्व दिलं जायचंच पण त्यापेक्षा कामाला अधिक प्राधान्य असे. त्यावेळी आम्ही खूप काम करायचो त्यामुळे पैसेही चांगले मिळायचे. शिवाय कामाचं समाधान असायचं. पण आता मोजक्याच निर्मात्यांबरोबर काम करायला आवडतं. आता वयाची सत्तरी झाली. तेव्हा प्रत्येक निर्मात्याच्या मागे धावणं शक्य नाही आणि प्रत्येकाच्या कामाशी ताळमेळ जमवणंही शक्य नाही. शिवाय मी फार महत्त्वाकांक्षी नाही. त्यामुळे आता चित्रपटाचं कथानक आवडलं आणि निर्मात्याशी माझे संबंध चांगले असले तरच मी गीतं लिहितो. रेहमानसाठी मात्र फार काळजीपूर्वक गीतं लिहावी लागतात. कारण त्याच्या मूळ तामिळ गीतांशी जुळणारे बोल मला लिहावे लागत, पण पुढे मी त्याच्यासाठी काम करणं बंद केलं. कारण तो रात्री-अपरात्री काम करतो आणि ते मला जमणारं नाही. *ताल*साठी सुखविंदर सिंग माझ्या घरी येऊन गीतं घेऊन जात. आता मला दगदग झेपत नाही.

मी पाच गीतं लिहू दे नाहीतर दहा. निर्मात्याशी मी करार करतो. गीताप्रमाणे पैसे घेत नाही. *दिल तो पागल है*ची गाणी *मोहब्बतें*पेक्षा जास्त होती. पण तसा विचार मी करत नाही. मी कधीच घोस्ट रायटिंग करत नाही किंवा एखाद्या नवोदिताची गीतं माझ्या नावावर खपवत नाही.'

आपल्या कारकीर्दीवर रफी साहेब, किशोरकुमार, मुकेश, लता आणि आशा यांचे मोलाचे सहकार्य लाभले असं बक्षी साहेब प्रांजळपणे सांगतात. 'आज अलका, उदित ही मुलं चांगलं काम करताना दिसतात. बघून समाधान वाटतं. आता परिस्थिती खरोखरच चिंताजनक आहे. हल्ली सोलो गाणी फारशी नसतातच. ड्युएट किंवा कोरस. शिवाय स्पर्धाही तीव्र आहे.'

एक जमाना होता जेव्हा एका दिवसात चार चार गीतांचं रेकॉर्डिंग होत असे. पण आता चार चार दिवसांत एखादं होतं. कधीतरी मी रोज एखादं गीत लिहितो तर काही वेळा महिनाभरात एक ओळही लिहीत नाही. शिवाय मी लिहिलेलं गाणं कोणी गावं याबाबत सूचना करूनही शेवटी ते कोणाला द्यायचं हे संगीतकारच ठरवतो.'

आपल्या जुन्या दिवसांच्या आठवणींत रमणारे आनंद बक्षी तितक्याच तत्परतेने सांगतात, 'गीत लिहीत नाही म्हणजे मी म्हातारा झालोय असं नाही. कारण आजच्या तरुण संगीतकारांबरोबर काम करण्याची माझी आजही तेवढीच तयारी आहे. तरुणांसाठी गीतं लिहिणारं माझं मन अजूनही तरुणच आहे. ●